<u>बातमी</u>

# विद्यापीठ प्रशासनाकडून पाच महाविद्यालयांवर असंलग्निकरणाची कारवाई

सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना नियमित प्राचार्य, शिक्षक, नॅक मुल्यांकन व इतर महत्वपूर्ण बाबींची पूर्तता करण्यासंदर्भात वेळोवेळी कळवूनही ज्या महाविद्यालयांनी त्रुटींची पूर्तता केलेली नाही अशा महाविद्यालयांचे संलग्निकरण काढून घेण्याबाबत विद्यापीठ प्रशासनाने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ व तद्अनुषंगिक परिनियमांमधील तरतुदीनुसार कारवाई सुरु केलेली होती.

विद्यापीठाने विहित केलेल्या आवश्यक बाबींची पूर्तता न केल्याने शै.वर्ष २०१२-१३ मध्ये संलग्नित ३३ महाविद्यालयांचे प्रथम वर्षाचे विद्यार्थी प्रवेश प्रतिबंधित करण्यात आले होते. तद्नंतर ज्या महाविद्यालयांनी विद्यापीठाने सुचित केलेल्या आवश्यक बाबींची पूर्तता केलेली आहे अशा महाविद्यालयांचे विद्यार्थी प्रवेश पूर्ववत करण्यात आलेले आहेत. परंतु खालील महाविद्यालयांनी वेळोवेळी मुदत देवून व नोटीस पाठवून देखील आवश्यक बाबींची पूर्तता केलेली नसल्याने विद्यापीठाने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ अन्वये असंलग्निकरणाची कार्यवाही पूर्ण करुन विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयान्वये विद्यापीठ कार्यक्षेत्रातील **राजीवजी गांधी बी.ए.बी.एड. कॉलेज, वैराग. ता.बार्शी, जय जगदंबा बी.सी.ए. महाविद्यालय, वैराग. ता.बार्शी, जय जगदंबा वरिष्ठ विज्ञान महाविद्यालय, वैराग. ता.बार्शी, दिलीप कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन, खांडवी. ता.बार्शी व श्री. विश्वेश्वरैय्या वाणिज्य महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयांचे संलग्निकरण शै.वर्ष २०१४-१५ पासून काढून घेण्यात आले आहे.**

विद्यापीठाने उपरोक्तप्रमाणे केलेली कार्यवाही ही विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा व गुणवत्ता टिकविण्यासाठी केलेली आहे. तसेच आगामी काळात जी महाविद्यालये महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याचे व विद्यापीठ आदेशांचे पालन करणार नाही अशा महाविद्यालयांवर असंलग्निकरणाची कार्यवाही सुरु करण्यात येईल. तसेच असंलग्निकरणाची कार्यवाही टाळण्यासाठी सर्व संलग्नित महाविद्यालयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा व विद्यापीठ आदेशांचे पालन करावे असे आवाहन प्राचार्य डॉ. भी.मु. भांजे, संचालक, बीसीयुडी यांनी केलेले आहे.